मे. पवनहंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड,
मुंबई यांच्याकडून हेलीकॉप्टर भाडे
तत्वावर घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.- एनएएक्स ०३१८/प्र.क्र.१३३/विशा १ ब.
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- २३ सप्टेंबर, २०१९.

<u>वाचा</u>- १. शासन निर्णय क्र. - एनएएक्स ०११६/प्र.क्र.२२/विशा १ ब, दि. ३०/१/२०१६.
२. शासन निर्णय क्र. - एनएएक्स ०३१८/प्र.क्र.१३३/विशा १ ब, दि. ३१/३/२०१८.
३. शासन निर्णय क्र. - एनएएक्स ०३१८/प्र.क्र.१३३/विशा १ ब, दि. २९/३/२०१९.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.- पोमसं/२१-अ/१९५/ हेलिकॉप्टर/१४४/२०१७, दि. १०/७/२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

मे.पवनहंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामध्ये दि. २२ मार्च, २०१६ ते २१ मार्च, २०१८ या दोन वर्षाकरीता नक्षलग्रस्त भागात पोलीस दलाचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच जखमी व्यक्ती तसेच जवानांची ने-आण करणे, जखमी जवानांना त्वरीत वैद्यकीय सहाय्य पुरविणे तसेच जवानांना खाद्यसामुग्री पुरविणे, संशयित भागाची पाहणी करणे इ. कामांकरिता हेलीकॉप्टर भाडे तत्वावर घेण्याकरीता करार करण्यात आला होता. संदर्भाधीन क्र. २ वरील शासन निर्णयान्वये दि. २२ मार्च, २०१८ ते २१ मार्च, २०१९ या एक वर्षाच्या कालावधीसाठी आणि संदर्भाधीन क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये दि. २२ मार्च ते २१ सप्टेंबर, २०१९ या सहा महिन्यांच्या कालावधीकरिता हेलिकॉप्टर भाड्याने घेण्यास मुदतवाढ देण्यात आली होती.

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकांच्या काळात नक्षलविरोधी अभियान तसेच यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी तसेच आपत्कालिन परिस्थितीमध्ये जखमी कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी व वेळप्रसंगी राज्याच्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासासाठी नागपूर येथे स्थित करण्यासाठी हेलिकॉप्टरची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत जर्मनी येथील उत्पादक कंपनीकडून हेलिकॉप्टर खरेदीची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे नवीन हेलिकॉप्टर उपलब्ध होईपर्यंत सध्या गडचिरोली जिल्हा पोलीस दलाकरिता तैनात असलेले हेलिकॉप्टर मे.पवनहंस लिमिटेड मुंबई यांच्याकडून ज्या अटी व शर्तींवर भाडेतत्त्वार घेण्याचा करार करण्यात आलेला आहे, त्याच अटी व शर्तींवर हेलिकॉप्टर भाडे तत्वावर घेण्यास मुदतवाढ देण्याची विनंती अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संदर्भाधीन क्र.४ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. त्यानुसार मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकांच्या काळात नक्षलग्रस्त अतिसंवेदशील भागात पोलीस पथके, ईव्हीएम मशीन्सची ने-आण करणे, नक्षलविरोधी अभियानादरम्यान पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे त्याचप्रमाणे मतदान अधिकारी व कर्मचारी यांची ने-आण करणे याकरीता सन २०१६ मध्ये झालेल्या दर करारानुसार मे.पवन हंस कंपनी लिमिटेड, मुंबई यांच्याकडून घेतलेल्या हेलिकॉप्टरची मुदत दि. २२ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, २०१९ किंवा जर्मनीकडून खरेदी केलेले हेलिकॉप्टर कार्यन्वीत होईपर्यंत या दोन्ही पैकी जे अगोदर घडेल तोवर वाढविण्यास वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुलक्षून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. यासाठीचा खर्च मागणी क्र. “बी-१, २०५५ पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५ ०१६८) ५१ मोटार वाहने” या लेखाशीर्षाखाली करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारीक संदर्भ क्र. ३१३/१९/व्यय-७, दि. १६/९/२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९२३१५४८३५६७२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Damodar Patil

Digitally signed by Vijay Damodar Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay Damodar Patil
Date: 2019.09.23 15:49:57 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, गृह विभाग.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद.
५. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा.
६. सर्व विधान परिषद / विधान सभा सदस्य.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१०. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. आयुक्त, राज्य गुप्तावार्ता विभाग, मुंबई.
१३. अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१४.अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / पुणे.
१६. विशेष पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
१७. जिल्हाधिकारी, गडचिरोली / गोंदिया.
१८. पोलीस अधिक्षक, गडचिरोली / अहेरी / गोंदिया.
१९. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
२०. जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर.
२१. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२२.निवडनस्ती (विशा-१ब).